# प्रेसनोट

**पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचेकार्यालय,**
**बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस जवळ,**
**पुणे-४११००६**

**जा.क्र./पोउआ/वाह/** 2240 /२०२४ **पुणे दिनांक** - 26/०३/२०२४

**विषय :- होळी व धुलीवंदनचे सणाचे अनुषंगाने केलेल्या कारवाई बाबत..**

काल दिनांक २५/०३/२०२४ रोजी संपुर्ण होळी व धुलीवंदन हा सण पुणे शहरात मोठ्या उत्साहात साजरा केला गेला. या उत्सवाचे अनुषंगाने पुणे शहरात विविध ठिकाणी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेले होते. होळी – धुलीवंदन सणाचे अनुषंगाने वाहतूकीच्या नियमांची पायमल्ली करणाऱ्या नागरिकांवर कायदेशिर कारवाई करण्यासाठी मा. श्री अमितेश कुमार, पोलीस आयुक्त पुणे शहर, श्री. प्रविण पवार, सह पोलीस आयुक्त पुणे शहर यांचे श्री. मनोज पाटील, अपर पोलीस आयुक्त पुर्व प्रादेशिक विभाग पुणे शहर व श्री. रोहिदास पवार पोलीस उप आयुक्त वाहतूक शाखा पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली पुणे शहर वाहतूक पोलीस व स्थानिक पोलीस स्टेशन यांचेकडुन पुणे शहरातील महत्वाचे रस्त्यांवरील एकुण २७ ठिकाणी विशेष नाकाबंदीचे आयोजन करण्यात आले होते.

नाकाबंदी दरम्याने एकुण १४२ इसमांवर मद्यसेवन करुन वाहन चालवत असले बाबतची **“ड्रंक ॲण्ड ड्राईव्हची”** कारवाई करण्यात आली तसेच २२६ वाहनचालकांना ट्रिपल सिट वाहन चालवत असलेबाबत दंड आकारण्यात आला तसेच रॉंग साईडने वाहन चालवणे, वाहन चालवत असताना मोबाईलवर बोलणे, कर्कश आवाजाचे मॉडीफाईड सायलन्सर वापरणे, सिग्नल तोडणे अशा प्रकारच्या इतर ९३३ कायदेशिर कारवाया करुन दंड आकारण्यात आला आहे. आगामी काळात देखील अशा प्रकारच्या कारवाया वाहतूक शाखेकडुन करण्यात येणार आहेत.

**(रोहिदास पवार)**
पोलीस उप-आयुक्त, वाहतूक शाखा
पुणे शहर